# वेध : एक कोलाज्

– डॉ. आनंद नाडकर्णी

एक-दोन नव्हे तर भक्कम पंचवीस वर्षे झाली ह्या गोष्टीला... ठाणे शहरामध्ये आपल्याला मनआरोग्य विषयावरची संस्था काढायची आहे ह्या विचाराने झपाटलेले आम्ही सारे असा विचार करत होतो की, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आपल्याला नवीन असे काय करता येईल! अशा 'टीन एजर्स'साठी आही 'एक टीन क्लब नावाचा उपक्रम सुरू केला होता. इंटरनेट पूर्व काळामध्ये मोबाईल असण्याचा प्रश्नच नव्हता. टेलिव्हिजनची झेपसुद्धा मर्यादित होती. त्यामुळे जगाविषयीचे ज्ञान आणि भान देणारी साधने कमीच होती. छापील शब्दांचा अर्थात पुस्तकाचा दबदबा जास्त होता.

आम्ही ह्या तरुण विद्यार्थ्यांबरोबर गप्पा मारायचो. दर रविवारी वेगवेगळ्या क्षेत्रातल्या पण जवळच्या व्यक्तींना बोलवून त्यांचे अनुभव सांगायला लावायचो. त्यामध्ये कधी शहनाईवादक शैलेश भागवत असायचे. कधी जलतरणपटू आरती प्रधान, कधी त्यावेळचे तरुण पोलीस अधिकारी हेमंत करकरे तर कधी पत्रकार निळू दामले! ही नावे अशासाठी सांगितली की आम्हाला एकही व्यवसाय, छंद वर्ज्य नव्हता. इटरेस्टींग माणसांबरोबरच्या गप्पांचा प्रभाव आमच्या क्लब मेंबर्सवर खूपच पडायचा. मुख्य म्हणजे तो टिकायचा.

आमच्या गटामध्ये नववी ते बारावी या गटातली मुले-मुली खूप होती. त्यामुळे आपण त्यांच्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन संदर्भातल्या चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून देऊ या अशी कल्पना डोक्यात आली. एव्हाना आमच्या क्लबमधल्या मुलामुलींच्या पालकांनी ह्या साऱ्यांचे पालकत्व मी आणि माझा सहकारी राजीव दुआ ह्यांना देऊन टाकल्यात जमा होते. आयपीएच ह्या आमच्या संस्थेचे केंद्र ज्या इमारतीच्या तीन खोल्यांमध्ये होते त्याच्या जवळचा फूटपाथ हा ह्या सगळ्यांचा रोजचा सायंकाळचा अड्डा व्हायचा. आठवड्याला दोन वेळा सगळेजण सेंटरच्या जागेत यायचे. तिथेच गटचर्चा व्हायच्या. आमच्याकडे फर्निचरही जेमतेम होते. त्यामुळे सगळी पंचवीस-तीस मुले-मुली जमिनीवरच बसायचो.

व्यवसाय मार्गदर्शनाच्या चाचण्यांची माहिती हळूहळू पसरायला लागली. पण त्या काळात अशा तऱ्हेच्या चाचण्या असू शकतात हेच बऱ्याच जणांना ठाऊक नव्हते. म्हणजे आमच्या केंद्रावर उपलब्ध असणारी सेवा लोकप्रिय करण्यासाठी काहीतरी नियमित उपक्रम करणे गरजेचे होते. कशी बरं तयार करावी ही 'इव्हेंट'?... विचार करता करता उत्तर सापडले... रविवारच्या पाहुण्यांच्या अनुभवसत्रांचेच एक शिबिर करायचे... त्याला नाव द्यायचे 'वेध'... Vocational Education Direction and Harmony.

अशाप्रकारे सुरुवात झालेला हा उपक्रम ठाणे शहरामध्ये तेवीस वर्षेसुरू रहाणार आहे. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातल्या आठ शहरांमध्ये पसरणार आहे. ह्याची सुतराम कल्पना त्या वेळी असणे शक्यच नव्हते. या अज्ञानाचे काही फायदेही झाले. मन लवचिक राहिले. उपक्रम नुसताच वाढला नाही तर evolve झाला, विकसित झाला... अजूनही होतो आहे. गंमत अशी वाटते की पंचवीस वर्षांनंतर बदललेल्या शतकामध्ये, प्रत्यक्ष संवादाचे मोल केवळ टिकून आहे असे नाही तर कदाचित अधिकच मौल्यवान झाले आहे. मानसिक आरोग्याचे एक महत्त्वाचे लक्षण आहे; वास्तवाचा मन:पूर्वक स्विकार करून जोपसलेला आशावाद, ह्या

आशावादाला परिश्रमाचे पंख असतात पण भूमीचे भानही असते. हा आशावाद भाबडा नसतो. पण समोरच्या आव्हानाची ताकदही लक्षात घेणारा असतो.

तर असा आशावाद पसरवणाऱ्या व्यासपीठांची उपक्रमांची गरज समाजाला नेहमीच असते. त्या अर्थाने आमीर खानचा 'सत्यमेव जयते', लोकसत्ता दैनिकाचा 'सर्वकार्येषु' हा उपक्रम आणि वेधची चळवळ हे एक सारखेच म्हटले पाहिजेत. वेधचे वैशिष्ट्य हे आहे की त्यामध्ये नवी माहिती मिळते, त्याचवेळी स्वत:कडे आणि जगाकडे पहायचा दृष्टीकोन मिळतो, आणि बरोबरीने मी माझ्या जीवनाचे 'श्रेयस' आणि 'प्रेयस' कसे शोधावे ह्या संदर्भातला विचारही सुरू होते.

भविष्याला कवेत घेऊ पहाणाऱ्या प्रत्येक तरुणापुढे हा प्रश्न असतो की मी नेमके कशाला आणि किती महत्त्व द्यायचे? पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, सन्मान, सुविधा ह्या सगळ्याची जरुरी तर प्रत्येकाला असते. ह्या गरजा भागवण्याचे माध्यम म्हणून व्यवसायाकडे पहायचे की निर्मितीचा आनंद देणारे क्षेत्र म्हणून?... व्यवसायामधल्या प्रक्रियेतला आनंद शोधायचा तरी कसा?... विशेषत: स्वत:च्या आवडीचे क्षेत्र नसेल तर... आणि बहुमताच्या विरोधामध्ये जाऊन स्वत:ला आवडते ते करण्याचा हट्ट पूर्ण करण्यासाठी किंमत कशी आणि कोणती द्यायची?... ह्या आणि अशा अनेक प्रश्नांकडे पहाण्याची दृष्टी मला स्वत:ला वेधमुळे मिलाली. आजच्या विद्यार्थी आणि पालकाच्या भूमिकेमध्ये स्वत:ला ठेवून; येणाऱ्या तज्ज्ञांबरोबर संवाद साधायला मला वेधने शिकवले.

वेधमध्ये आपण ज्या व्यक्तींना पाहुणे म्हणून बोलवतो. त्या सगळ्यांमध्ये एक समान धागा आहे. ते सगळे आपापल्या क्षेत्रामध्ये प्रवास करत असताना स्वत:ला 'मर्यादित स्व' पासून दूर काढण्याच्या प्रयत्नात आहेत. काही जणांसाठी स्वत:च्या क्षेत्राबद्दलची बांधिलकी हीच शक्ती असते. 'बुटक्या स्व' पासून मुक्ती मिळवण्याची! काही जण आपल्या कामासाठी संघशक्ती वापरून आपल्या 'स्व'ला विशालरुप देतात. तर काही जण निसर्गाशी तादात्म्य साधत विशाल 'स्व'चा अनुभव घेतात. काही जण शिक्षक आणि प्रेरक बनून आपली उर्जा दुसऱ्यांना देतात. म्हणजे वेधमधली व्यक्ती स्वत:च्या शहाणपणापासून मिळवलेली उर्जा दसपट करून पुन्हा इतरांना देणारे एक 'पॉवर हाऊस' असते.

त्यातील अनेक ऊर्जास्थाने रूढार्थाने लोकप्रिय नसतात. तरीही एकूण पन्नास आवर्तनांमधून अशी सुमारे चारशे-साडेचारशे 'पॉवरहाऊसेस' वेधमुळे आपल्यासमोर आणली हाही आशावादी राहण्यासाठीचा सबळ पुरावाच म्हणायला हवा... तर मुद्दा असा की व्यवसायाची निवड कशी करावी ह्या टप्प्यावर सुरू झालेला वेध आता, कसे जगायचे हे सांगणारे व्यासपीठ बनला आहे.

आणखी एक वैशिष्ट्य असं जाणवतं की वेधच्या संवादांमध्ये आरसपानी नितळपणा आहे. इथे आलेले तज्ञ आपले 'माणूसपण' कधी विसरत नाहीत. किंबहुना आपल्या बलस्थानांबरोबरच आपल्या अपूर्णतासुद्धा शेयर करतात. साऱ्याच व्यासपीठांना हा आशीर्वाद नसतो. त्यामुळेच की काय ज्यांच्याभोवती ग्लॅमरचे वलय असते त्यांच्यामधले सामान्यत्वसुद्धा पुढे येते. आणि ज्यांना आपण अगदीच सर्वसामान्य मानत असतो त्यांच्यामधले आजवरचे न दिसलेले वेगळेच 'ग्लॅमर' झळाळून पुढे येते; २०१३ च्या डिसेंबरमध्ये ठाण्याच्या २२ व्या वेध मध्ये गेवराईच्या संतोष गर्जेबरोबर संवाद सुरू होता. स्वत:च्या वाट्याला अनाथपण आल्यावर इतर अनाथांसाठी घर सुरू करून दहा वर्षे त्या घरासाठी धडपडणारा संतोष नितळपणे त्याची कहाणी सांगत होता. आमचा संवाद कधी संपला ते कळलेही नाही. मी संतोषच्या प्रवासाला शुभेच्छा दिल्या.

त्यानंतरचे सत्र होते उमेश कामत आणि स्पृहा जोशी ह्या माध्यमातील ताऱ्यांचे. ग्रामीण भागात काम करणाऱ्या एका तरुणाच्या अनुभव कथनानंतर दोन

स्टार्स... आमचे सत्र सुरू असताना आयपीएच संस्थेच्या स्टॉलवर दात्यांची रांग लागली. पुढच्या तासामध्ये ५२००० रुपये जमा झाले. त्यामध्ये ‘वेध’च्या मानधनाची भर घालून मी संतोषला ती रक्कम सुपूर्द केली. त्यासाठी मी संतोषला पुन्हा एकवार व्यासपीठावर बोलावले. कार्यक्रमाचा समारोप झाला. पुढचा दीड तास श्रोत्यांनी रांगा लावून आपली देणगी आमच्यापर्यंत पोहोचवली. शाळेतल्या विद्यार्थ्यांनी जवळचे दहा-वीस-पन्नास रुपये एकत्र करून आपला वाटा उचलला... एकूण तीन लाख रुपये जमा झाले होते... दरम्यान आम्ही जाहीर केलेल्या बँक अकाऊंटवर आणि संस्थेच्या कार्यालयात पुढचे पाच दिवस चेक येत राहिले. जवळजवळ साडेपाच लाख रुपये जमा झाले होते. संतोषच्या मुलांसाठी त्यांचे स्वत:चे घर ह्या पैशातून निर्माण झाले.

वेधने केलेले हे महत्त्वाचे Value Statement आहे. अनेक सामान्यांना ‘बुटक्या स्व’च्या बाहेर येऊन मदत करावीशी वाटणे आणि उत्स्फूर्तपणे होणाऱ्या कृतीमधून ती इतक्या प्रभावीपणे व्यक्त होणे... जादूई क्षण होता तो... वेध नावाचे संस्कारपीठ अनेकांच्या विधायक कृतीमुळे उजळून निघाले होते. योग्य विचारांना कृतीचे कोंदण मिळाल्यावरच त्याला आपण ‘संस्कार’ म्हणतो.

वैयक्तिक पातळीवर अनेकांच्या मनावर हा संस्कार झाल्याचे अनेकवार माझ्या अनुभवाला येते. परदेशातून कधी देणगीचा चेक येतो.. वेधमुळे जीवनाला दिशा मिळाली असे सांगणाऱ्या एका तरुणीच्या कृतज्ञतेचे प्रतीक बनून. इग्लंडमधून आलेला एक मुलगा तब्बल बारा वर्षांनंतर मुद्दाम ‘वेध’ला पुन्हा येतो आणि भरल्या डोळ्याने आपली वाटचाल मला सांगतो.... एक विद्यार्थिनी म्हणून ‘वेध’ला आलेली एक तरुण खेळाडू तरुणी त्याच व्यासपीठावर ‘फॅकल्टी’ म्हणून येते आणि आपला प्रवास सर्वांसमोर मांडते... जगण्याला आकार देण्याचे साधन म्हणून किती जणांनी वेधच्या अनुभवाचा उपयोग केला, करत आहेत आणि माझी खात्री आहे यापुढेही करत राहतील.

माझ्यासाठी प्रत्येक शहरातल्या प्रत्येक ‘वेध’चे नवीन आवर्तन म्हणजे, जागेपणी वारंवार पाहिलेले एक स्वप्न असते. कोणत्याही ‘वेध’चे शेवटचे सत्र संपले की एका बाजूने शरीर रिलॅक्स झालेले असते आणि मन समाधानाने भरलेले असते... त्याच क्षणाला पुढच्या स्वप्नाची पहिली प्रतिमा, मऊ पहाटेचे स्वप्न घेऊन येते..

पुणे, नगर, नाशिक, ठाणे, कल्याण, औरंगाबाद, लातूर एक एक स्वप्न प्रतिमा आपली जागा पकडते. कोलाज तयार होतो. विलक्षण गतिशील गंमत म्हणजे दृष्य बदललात पण कोलाजचे अस्तित्व निरंतर असते... जणू माझ्या श्वासाच्या तालावर ते डोलत असते.

–डॉ. आनंद नाडकर्णी

**INSTITUTE FOR PSYCHOLOGICAL HEALTH**

आय्.पी.अेच्. - पंचवीस वर्षांपूर्वी हे बोधचिन्ह तयार केले गोपाल अय्यर नावाच्या कलाकाराने. आज स्वत:ची जाहिरात एजन्सी चालवणारा गोपाल त्या काळामध्ये नुकताच गर्दच्या व्यसनातून बाहेर पडला होता. नवीन कल्पनांचे फुलपाखरू, सुदृढ मी अर्थात ळ ला फुटलेलले पंख अशा अनेक पद्धतीने ह्या प्रतिकाकडे पहाता येते.